इ० ५१

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर    **P.S.(ठाणे):** शहर चौक

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0331    **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2022 12:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 3
   **Date From (दिनांक पासून):** 20/10/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/10/2022
   **Time From (वेळेपासून):** 07:04 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 07:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/10/2022    **Time (वेळ):** 11:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/10/2022 11:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1.5 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साईबाबा मंदीराजवळ,लेबरकलनी, विश्वासनगर,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): अंकुश राम भाऊ ढवळे

(b) Father's Name (वडील चे नाव) : रामभाऊ ढवळे

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1966

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कष्णमंदीरा जवळ, जाधववाडी,शांताबाई धनगर यांचेकडे भाड्यान,औरंगाबाद, सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कष्णमंदीरा जवळ, जाधववाडी,शांताबाई धनगर यांचेकडे भाड्यान,औरंगाबाद, सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9763549984

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ईस्माईल शमशु पठाण | | वडील का नाम : शमशु पठाण | 1. पहाडसिंगपुरा, ,प्लट नं 3, ईब्राहीमशाह कलनी,औरंगाबाद , बेगमपूरा,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 Total value of pro...
(चोरीस गेलेल्या मालम...
11.Inquest R...
(इनक्वेस्...
S.N...

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक

20/10/2022.
मी अंकुश रामभाऊ ढवळे, वय-56 वर्षे, शिक्षण- निरक्षर, व्यवसाय-शेती रा.कृष्णमंदीरा जवळ, जाधववाडी, शांताबाई धनगर यांचेकडे भाड्याने औरंगाबाद. मो.क्र. 9763549984.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 12/10/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे," मी वरील प्रमाणे असुन मुळचा बेलोरा ता.जि.बीड येथील रहिवाशी आहे. सध्या मी माझे पत्नीचे ड्युटीमुळे वरील ठिकाणी भाड्याने राहतो. माझी पत्नी नामे सौ.मंगलबाई अंकुश ढवळे या सन-1999 पासुन औरंगाबाद महानगरपालिका यांचे आस्थापने वरील झोन क्रमांक 4, सौभाग्य मंगल कार्यालया शेजारी, औरंगाबाद येथे सफाई कर्मचारी म्हणुन नोकरीस आहे. झोन क्रमांक 4 मधील सर्व सफाई कर्मचारी यांची हजेरी दररोज रंगीनगेटच्या समोर सकाळी सहा वाजता होत असते. मी माझे पत्नी सौ.मंगलबाई यांना दररोज सकाळी सहा वाजता ड्युटीचे ठिकाणी रंगीनगेट येथे सोडतो. तेथे झोन क्र.4 येथील सफाई जवान श्री.पठाण तात्पुरते मुकादम हे हजर असणा-या सर्व सफाई कर्मचारी यांची हजेरी घेऊन त्यांना ड्युटीचे ठिकाणी रवाना करतात व हजर असणा-या कर्मचा-यांची माहिती निरीक्षक श्री. भाले साहेबांना फोनद्वारे देतात.श्री. पठाण हे तात्पुरते मुकादमाचे काम करीत असल्याने मी श्री.पठाण यांना चांगल्या प्रकारे ओळखतो. माझे पत्नीला छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालया समोरील रोडवरील साफसफाई करण्याची ड्युटी नेमलेली आहे. श्री.पठाण हे सर्व सफाई कर्मचा-यांच्या हजे-या प्रत्येक महिन्याच्या 20 तारखेला श्री. भाले साहेब यांना देतात. त्यावरुन भाले साहेब सर्व सफाई कर्मचा-यांच्या हजे-या भरुन पाठवतात. श्री.पठाण हे मुद्दामहुन काही सफाई कर्मचारी कामावर आलेले असताना सुदधा तुंम्ही उशीरा आले तुमची गैरहजेरी पडली आहे. तुमची गैरहजेरी मी भाले साहेबांना देणार गैरहजेरी जाऊ दयायची नसेल तर तुंम्हाला मला पैसे दयावे लागतील असे म्हणतात. मागच्या महिन्यात श्री.पठाण मला म्हणाले होते की, तुमच्या पत्नीच्या दोन गैरहजे-या आहेत मला पैसे दया मी संपुर्ण दिवसांची हजेरी पाठवतो असे म्हणाले होते. परंतु मी काही पैसे दिले नव्हते. त्यामुळे श्री.पठाण यांनी माझे पत्नीची गैर हजेरी पाठविल्याने तिचा दोन दिवसाचा पगार कट झाला आहे.

आज दिनांक 12/10/2022 रोजी मी नेहमी प्रमाणे पत्नीस कामावर सोडुन घरी आलो होतो. दुपारी 01.00 वा चे सुमारास माझी पत्नी कामावरुन घरी आली तेंव्हा ती मला म्हणाली की, माझी चालु महिन्यात एक ही गैरहजेरी नसतांना पठाण साहेब म्हणत होते की, दोन गैरहजे-या आहेत. गैरहजे-या पाठवायच्या नसतील तर तुमच्या पतीला मला भेटायला सांगा, तुमच्या पतीने मागील महिन्यात मला पैसे न दिल्यामुळे तुमचा दोन दिवसाचा पगार कमी झाला होता.आता चालु महिन्यात तुमच्या गैरहजे-या पाठवायच्या नसतील तर तुमच्या पतीला माझेकडे पाठवुन द्या असे पठाण साहेब म्हणाल्याचे पत्नीने मला सांगीतले. तरी श्री.पठाण हे मागित असेलेले पैसे हे लाच म्हणुन मागत आहे. त्यांना माझी लाच देण्याची इच्छा नाही. माझा श्री.पठाण यांचेशी कोणताही देण्या-घेण्याचा व्यवहार नाही, अगर वैर-दुष्मनी नाही.

दिनांक 19/10/2022 रोजी मी माझे पत्नी सौ.मंगलबाई यांच्या दोन दिवस गैरहजेरी बाबत श्री. पठाण (तात्पुरते मुकादम) यांना भेटणार आहे. त्यावेळी श्री पठाण हे माझे कडे माझ्या पत्नीच्या कामावरील गैरहजे-या न दाखविण्यासाठी पैशाची मागणी करुन स्वत: अगर इतरांमार्फत स्वीकारणार आहेत. तेंव्हा त्यांना पैशासह पकडुन त्यांच्याविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार दिली होती.

माझे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करणेकामी शासकीय दोन पंचांना पोलीस निरीक्षक श्री. हनुमंत वारे यांनी दिनांक 19/10/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे बोलावुन त्यांचा ओळख परिचय करून दिला. मी माझी तक्रार पंचांना तोंडी सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.वारे यांनी माझी टंकलिखीत दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. पंचांनी ती वाचल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.वारे व पंचांनी सदर तक्रारीवर सह्या केल्या. तक्रारदार



Scanned with OKEN Scanner

श्री.पठाण तात्पुरते मुकादम यांची लाच मा...
श्री. ढवळे यांचे तक्रारीचे अनुषंगाने झोन क्र. 4 येथील सफाई मजुर श्री.पठाण तात्पुरते मुकादम यांची लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय पो.नि.श्री. वारे यांनी पंचाच्या संमतीने घेतला.
त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. वारे यांचे सुचनेप्रमाणे मला व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझेकडे दिल्याने मी व पंच
क्र. 1 माझेकडील मोटार सायकलने दिल्लीगेट येथे चहाच्या हॉटेलजवळ पोहोचलो. त्यानंतर सफाई मजुर श्री.पठाण
(तात्पुरते मुकादम) यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी तुम्ही तेथेच थांबा मी तुम्हाला भेटायला येतो. असे
सांगितले. थोड्या वेळाने तेथे श्री. पठाण आले व त्यांना मी माझे पत्नीचे गैरहजे-या टाकु नका अशी विनंती केली.
तेव्हा श्री.पठाण यांनी माझ्याकडे तुमच्या पत्नीची गैरहजेरी मी भाले साहेबांना देणार आहे. गैरहजेरी जाऊ दयायची
नसेल तर मला 6,000/- (सहा हजार रुपये ) द्यावे लागतील तरंच मी संपुर्ण दिवसांची हजेरी पाठवतो असे म्हणाले.
व सहा हजार रुपये दुपारी सव्वा एक वाजता दिल्ली गेट येथे घेऊन या मी येथेच आहे. असे म्हणुन मला लाचेची
मागणी केली. परंतु माझेकडुन दुपार पर्यंत सहा हजार रुपयाची व्यवस्था झाली नाही. असे मी त्यानंतर पो.नि.वारे
यांना कळविले असता त्यांनी माझे व पंचाचे समंतीने पैशाची व्यवस्था झाल्यावर लाचेचे सहा हजार रुपये श्री.पठाण
यांना उद्या दिनांक 20/10/2022 रोजी ते म्हणतील त्या ठिकाणी जसा संपर्क होईल त्या ठिकाणी देण्याचे ठरले.
दररोज सकाळी श्री.पठाण हे सफाई कर्मचारी यांची सकाळी सहा वाजता हजेरी झाल्यानंतर साईबाबा मंदीर,
विश्वासनगर, लेबर कॉलनी,औरंगाबाद या ठिकाणी थांबत असतात याबाबत मी पो.नि.श्री. वारे यांना माहिती दिली.
दिनांक 20/10/2022 पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी मला, सापळा पथकास व दोन्ही पंचास सापळा कारवाईचे
अनुषंगाने सुचना दिल्या. तेव्हा सफाई जवान श्री. पठाण यांना लाच म्हणुन देण्याकरीता 500/- रूपये दराच्या 12
चलनी नोटा मी हजर केल्या. त्यावेळी मला व पंचांना ॲन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करून
दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात
आल्या. व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझेकडे देण्यात आले. पोलीस
निरीक्षक श्री. वारे यांचे सुचनेप्रमाणे मी, पंच क्र.1 यांना सोबत घेवुन माझेकडील मोटार सायकलने साईबाबा मंदीर,
विश्वासनगर, लेबर कॉलनी,औरंगाबाद या ठिकाणी गेलो.पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक व पंच
क्र.2 असे येवुन कोणास संशय येणार नाही अशा रीतीने सापळा लावुन थांबले. मी व पंच क्र. 1 असे विश्वासनगर,
लेबरकॉलनी, औरंगाबाद येथील साईबाबा मंदीराजवळ थांबलो तेथे मला श्री. पठाण दिसले नाही, म्हणुन मी त्यांना
माझे मोबाईल वरुन त्यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला मंदीराजवळच थांबा मी थोड्याच वेळात येतो
असे सांगितले. त्यानंतर थोड्याच वेळात तेथे श्री.पठाण हे त्यांचे मोटार सायकलवर आले आमची थोडावेळ चर्चा
झाली. त्यांनी मला त्यांचेजवळील हजेरी पट दाखविले व आता मी हजेरी पट भरणार आहे. असे म्हणुन हजेरी पट
डाव्या हातात ठेवले. मागणी केल्याप्रमाणे 6,000/- रूपये लाचेची रक्कम माझेकडुन श्री. पठाण यांनी उजव्या
हाताने स्वत: स्विकारून त्यांचे उजव्या हातातच ठेवली. त्यानंतर मी सकाळी 07:04 वाजेच्या सुमारास
पुर्वनियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक, पंच क्र.2 यांचेसह तेथे हजर आले. त्यावेळी
पोलीस निरीक्षक श्री.वारे यांनी श्री.पठाण यांना ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे
नाव ईस्माईल शमशु पठाण, वय-49 वर्षे, व्यवसाय-सफाई जवान झोन क्रमांक 4, म.न.पा. औरंगाबाद रा.
ईब्राहीमशाह कॉलनी, प्लॉट नं. 3,पहाडसिंगपुरा, औरंगाबाद असे सांगितले.श्री. ईस्माईल पठाण यांचे उजवे हातातुन
लाचेची रक्कम 6,000/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर
केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळुन आले आहे.

अशा प्रकारे श्री.ईस्माईल शमशु पठाण, वय-49 वर्षे, व्यवसाय-सफाई जवान झोन क्रमांक 4, म.न.पा.औरंगाबाद रा. ईब्राहीमशाह कॉलनी, प्लॉट नं. 3,पहाडसिंगपुरा, औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझे पत्नी सौ.मंगलबाई यांची दोन दिवसांची गैरहजेरी न देण्यासाठी व मागील हजे-या लावण्याचा मोबदला म्हणुन मला सहा हजार रुपयेची मागणी करुन सहा हजार रुपये दिले तरंच मी संपुर्ण दिवसांची हजेरी पाठवतो असे म्हणुन 6,000/- रूपये पंचासमक्ष लाचेची मागणी करून मागणी प्रमाणे 6,000/- रूपये लाचेची रक्कम दिनांक 20/10/2022 रोजी 07:04 वाजता साईबाबा मंदीराजवळ, लेबरकॉलनी, विश्वासनगर, औरंगाबाद येथे पंचासमक्ष माझेकडुन श्री.ईस्माईल शमशु पठाण यांनी स्वत: स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ही फिर्याद दिली ,

दाखल करणार .... पोउपनि श्री.रोहीत गांगुर्डे ने.पो.स्टे.सिटीचौक, औरंगाबाद शहर.



Scanned with OKEN Scanner

तपास अधिकारी .... पो.नि.श्री.हनुमंत वारे ने. ला.प्र.वि. औरंगाबाद

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
ASHOK UTTAMRAO GIRI(I (Inspector)) / POBN63590 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ASHOK UTTAMRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN63590

डी.ओ. अधिकारी
पोलीस स्टेशन सिटीचौक
औरंगाबाद शहर



Scanned with OKEN Scanner